OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR

# ओल्ड गोआ ऑईल्स आरती संग्रह



**www.oldgoa.in**



## वक्रतुंड महाकाय

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ |
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ||

## गणपतीची आरती

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची |
नुरवी पूर्वी प्रेम कृपा जयाची |
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची |
कंठी झळके माळ मुक्ताफळाची || १ ||
जय देव जय देव जय मंगलमूर्ती |
दर्शनमात्रे मनकामना पुरती ||
रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा |
चंदनाची उटी कुंकुमकेशरा |
हिरे जडित मुकुट शोभतो बरा |
रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया || 2 ||
लंबोदर पितांबर फनी वरवंदना |
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना |
दास रामाचा वाट पाहे सदना |
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना |
जय देव जय देव जय मंगलमूर्ती |
दर्शनमात्रे मनकामना पुरती || ३ ||

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



# शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।
वीषें कंठी काळा त्रिनेत्रीं ज्वाळां।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।1।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।।
आरती ओवाळूं तुज कर्पुगौरा ।।ध्रु.।।
कर्पुगौरा भोळा नयनीं विशाळा।
आर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय. ।।2।।
देवी दैत्यीं सागरमंथन पैं केलें।
त्यामाजी जें अवचित हळाहळ उठिलें।
तें त्वां असुरपषं प्राशन केलें।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें।। जय. ।।3।।
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी।
रघुकुलतिलक रामदासा अंतरी।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।।4।।

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



# दुर्गे आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी।
अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी।
वारी वारी जन्म मरणांते वारी।
हारी पडलो आता संकट निवारी॥१॥
जय देवी जय देवी महिषा सुरमथिनी।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी॥धृ॥
तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही।
साही श्रमले परंतु न बोलवे काही।
साही विवाद करिता पडले प्रवाही।
ते तू भक्तालागी पावसी लवलाही॥२॥
प्रसन्न वदने प्रसन्न होती निजदासा।
क्लेशांपासूनी सोडवी तोडी भवपाशा।
अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा॥३॥

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH·BODY·HAIR



## ज्ञानराजा आरती

आरती ज्ञानराजा |महाकैवल्यतेजा | सेविती साधुसंत ||
मनु वेधला माझा || आरती || धृ ||
लोपलें ज्ञान जगी | हित नेणती कोणी | अवतार पांडुरंग |
नाम ठेविले ज्ञानी || १ || आरती || धृ ||
कनकाचे ताट करी | उभ्या गोपिका नारी | नारद तुंबर हो ||
साम गायन करी || २ || आरती || धृ ||
प्रकट गुह्य बोले | विश्व ब्रम्हाची केलें |
रामजनार्दनी | पायी मस्तक ठेविले | आरती ज्ञानराजा |
महाकैवल्यतेजा || सेविती || ३ ||

# हे भोळ्या शंकरा

हे भोळ्या शंकरा आवड तुला बेलाची
हे भोळ्या शंकरा हे भोळ्या शंकरा
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..
गळ्या मध्ये रुद्राक्षाचा माडा
लावितो भस्म कपाडा
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..
त्रिशूल डमरू हाती
संगे नाचे पार्वती
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..

भोलेनाथ आलो तुमच्या द्वारी
कोठे दिसे ना पुजारी
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..
हाता मध्ये घेउन झारी
नंदयावरी करितो सवारी
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..
माथ्यावर चंद्राची कोर
गळ्या मध्ये सर्पाची हार
आवड तुला बेलाची बेलाच्या पानाची
हे भोळ्या शंकरा ..

www.oldgoa.in
OLD GOA™
HEALTH·BODY·HAIR



# आरती विठ्ठलाची

येई हो विठ्ठले माझे माउली ये ||

निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहे ||

आलिया गोलिया हाती धाडी निरोप |

पंढरपुरी आहे माझा मायबाप || १ ||

पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला |

गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला || २ ||

विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिपवाळी ||

विष्णुदास नामा जीवेभावे ओवाळी || ३ ||

असो नासो भाव आम्हा तुज्या थाया

कृपाद्रिष्टि पाहे माझा पंढरीराया

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ॥

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



## सत्यनारायण आरती

जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥
पंचारति ओवाळूं श्रीपति तुज भक्तिभावा ॥

विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण ॥
परिमलद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ॥
घृतयुक्तशर्करामिश्रित गोधूमचूर्ण ॥
प्रसाद भक्षण करितां तूं त्यां प्रसन्न नारायण ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

शतानंदे विप्रें पूर्वी व्रत हें आचरिलें ॥
दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें ॥
त्यापासुनि हें व्रत या कलियुगीं सकळां श्रुत झालें ॥
भावार्थे पूजितां सर्वां इच्छित लाधलें ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें ॥
इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिलें ॥
त्या पापानें संकटिं पडुनी दुःखहि भोगीलें ॥
स्मृति होउनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धिरलें ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ॥
क्षोभ तुझा होतांचि तयाची नौका बुडाली ॥
अंगध्वजरायासी यापरि दुःखस्थिति आली ॥
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णीं परिसीली ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ॥
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ॥
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनि ॥
ऐसा भक्तां संकटिं पावसी तूं चक्रपाणी ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

अनन्यभावें पूजुनि हें व्रत जेजन आचरती ॥
इच्छित पुरविसि त्यांतें देउनि संतति संपत्ति ॥
संहरसी भवदुरितें सर्वहि बंधने तुटती ॥
राजा रंका समान मानुनि पावसि श्रीपती ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णूं मी कैसा ।
भक्तिपुरःसर आचरती त्यां पावसि जगदीशा ।
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ॥
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ॥
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



# प्रदक्षिणा आरती

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरूरायाची
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची
पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी
सर्वही तीर्थे घडली अम्हां आदिकरूनि काशी
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरूरायाची
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची
मृदंग-टाळ-ढोल-भक्त भावार्थे गाती
नामसंकीर्तने ब्रह्मानंदे नाचती
कोटी ब्रह्महत्या हरिती करिता दंडवत
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात
प्रदक्षिणा करूनि देह भावे वाहिला
प्रदक्षिणा करूनि देह भावे वाहिला
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



## घालिन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धु: सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।
अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।
।। मंगलमुर्ती मोरया ।।
।। गणपतिबाप्पा मोरया ।।
नारदांनी रचिलेले झाले संपूर्ण स्तोत्र हें ।
श्रीधराने मराठींत पठण्या अनुवादिले ॥ ८ ॥
॥ श्रीगणपती स्तोत्र संपूर्ण ॥

www.oldgoa.in
OLD GOA™
HEALTH·BODY·HAIR



**गणपती स्तोत्र संस्कृत**

प्रणम्यं शिरसा देव गौरीपुत्रं विनायकम ।

भक्तावासं: स्मरैनित्यंमायु:कामार्थ सिद्धये ।।१।।प्रथमं वक्रतुंण्डं च एकदन्तं द्वितीयकम ।

तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम ॥२॥लम्बोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ।

सप्तमं विघ्नराजं च धूम्रवर्णं तथाष्टमम् ॥३॥नवमं भालचन्द्रं च दशमं तु गजाननम् ।

एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम् ॥४॥द्वादशैतानि नामामि त्रिसन्ध्यं य: पठेन्नर: ।

न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकरं प्रभो ॥५॥विद्यार्थी लभते विद्यां, धनार्थी लभते धनम् ।

पुत्रार्थी लभते पुत्रान्-मोक्षार्थी लभते गतिम् ॥६॥जपेद गणपतिस्तोत्रं षडभिर्मासै: फलं लभेत् ।

संवत्सरेण सिद्धिं च लभते नात्र संशय: ॥७॥अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा य: समर्पयेत ।

तस्य विद्या भवेत्सर्वा गणेशस्य प्रसादत: ॥८॥॥इति श्रीनारदपुराणे श्री संकटनाशन गणेशस्तोत्रं सम्पूर्णम ॥

**Ganpati Stotra Marathi Lyrics**

**(श्री गणपती स्तोत्र मराठी भाषांतर )**साष्टांग नमन हे माझे गौरीपुत्रा विनायका ।

भक्तीनें स्मरतो नित्य आयु:कामार्थ साधती ॥ १ ॥प्रथम नांव वक्रतुंड दुसरें एकदंत ते ।

तिसरे कृष्णपिंगाक्ष चवथे गजवक्र ते ॥ २ ॥पाचवे श्री लंबोदर सहावें विकट नांव ते ।

सातवे विघ्नराजेंद्र आठवे धुम्रवर्ण ते ॥ ३ ॥नववे श्री भालचंद्र दहावे श्री विनायक ।

अकरावे गणपती बारावे श्री गजानन ॥ ४ ॥देवनांवे अशी बारा तीन संध्या म्हणे नर ।

विघ्नभीती नसे त्याला प्रभो ! तू सर्व सिद्धिदे ॥ ५ ॥विद्यार्थ्याला मिळे विद्या धनार्थ्याला मिळे धन ।

पुत्रार्थ्याला मिळे पुत्र मोक्षार्थ्याला मिळे गति ॥ ६ ॥जपता गणपती स्तोत्र सहा मासांत हे फळ ।

एक वर्ष पुर्ण होतां मिळे सिद्धी न संशय ॥ ७ ॥नारदांनी रचिलेले झाले संपूर्ण स्तोत्र हें ।

श्रीधराने मराठींत पठण्या अनुवादिले ॥ ८ ॥॥ श्रीगणपती स्तोत्र संपूर्ण ॥

www.oldgoa.in

OLD GOA™
HEALTH· BODY· HAIR



# गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा

- Strengthens the Immune System
- Boosts Brain Health & All-Day Energy
- Enhances Good HDL Cholesterol
- Stimulates Metabolism & Digestion
- Regulates Thyroid & Endocrine Systems
- Controls Blood Glucose Levels
- Helps in Weight Loss & Management
- Builds Antioxidant Defense Against Aging




www.oldgoa.in

**VIRGIN COCONUT OIL**

made from fresh coconut milk

# आमंचे ओल्डगोवाचे तेल

**OLD GOA™**

HEALTH · BODY · HAIR